**<u>संत तुकाराम वनग्राम योजना</u>**

सुधारीत तरतुदी-२

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २००५/प्रक्र.३१३/फ-२
मंत्रालय,मुंबई- ४०००३२,
दिनांक:- १५.५.२००८

**वाचा** :- १. शासन निर्णय क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२०००/ प्रक्र.१४३/फ-२, दि.२५.४.२००३

२. शासन निर्णय समक्रमांक दिनांक २३.११.२००६ व दि.१५.२.२००८

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यामधील संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २३.११.२००६ अन्वये ‘‘संत तुकाराम वनग्राम योजना’’ ची सुरुवात करण्यात आली असून या योजनेस राज्यामधून मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.२.२००८ अन्वये मराठवाडा प्रशासकीय विभागातील उत्कृष्ट संयुक्त वनव्यवस्थापन समितीस रु.१.५१ लक्ष रकमेचे प्रोत्साहनपर बक्षिस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता शासनाने या योजनेच्या दिनांक २३.११.२००६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या जिल्हास्तरीय बक्षिसाच्या रकमेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

**१. <u>जिल्हा स्तरावरील बक्षीसाच्या रकमेमध्ये वाढ</u> -**

जिल्हा स्तरावरील गुणानुक्रमे उत्कृष्ट ठरणा-या ३ संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना संत तुकाराम वनग्राम उत्कृष्ट जिल्हास्तरीय संयुक्त वनव्यवस्थापन समिती

पारितोषिक प्रदान करण्यात येते . या पारितोषिकांच्या सुधारीत रकमा खालीलप्रमाणे राहतील.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | रु.५१,०००/- |
| द्वितीय क्रमांकांचे बक्षीस | रु.३१,०००/- |
| तृतीय क्रमांकांचे बक्षीस | रु.११,०००/- |

सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून वरीलप्रमाणे बक्षिसांचे वितरण करण्यात येईल

या व्यतीरिक्त इतर तरतूदी शासन निर्णय दिनांक २३.११.२००६ प्रमाणेच राहतील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९४/०८/व्यय-१०, दिनांक २४.४.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(प्रफुल ठाकूर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वनविभाग